# खराडे ॲग्रो

फ्रुटनेट आणि अँटी फोग बॅगचे विश्वसनीय उत्पादक!

अंक: नववा || संपादन: श्रीमंत-पब्लिकेशन, पुणे || दि. ०१ ऑक्टोबर, २०२४

## देशी गाय झाली 'राज्यमाता-गोमाता'



संस्कृतीक महत्व



औषधी गुणतत्व





शेतीसाठी फायदेशीर



पूर्ण आहार

### गायीचे संस्कृतीक महत्व होणार ठळक!

### कृषी जगतातील विशेष घडामोडी

- शेतकऱ्यांसाठी मोदी सरकारचा मोठा निर्णय: PM-AASHA योजनेसाठी 35 हजार कोटी मंजूर.
- जैवतंत्रज्ञानातील प्रगतीसाठी 'बायो-राइड' योजनेला मान्यता.
- शेतकऱ्याचा क्रांतिकारी शोध; भंगारातून बनवला 55 फूटाचा हायड्रोलिक बूम स्प्रे, 20 मिनिटात दहा एकरांची फवारणी!
- नवरात्रीमध्ये शेतकऱ्यांना मिळणार पीएम किसान योजनेचा लाभ, ५ ऑक्टोबरला १८ वा हप्ता जमा होणार.
- शेतकऱ्याचा क्रांतिकारी शोध: भंगारातून बनवला 55 फूटाचा हायड्रोलिक बूम स्प्रे, 20 मिनिटात 10 एकरांची फवारणी.

मंबई, सप्टेंबर ३०: महाराष्ट्रातील देशी गायींना 'राज्यमाता-गोमाता' घोषित करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय मंजूर करण्यात आला आहे. राज्यातील देशी गायींच्या संख्येत घट होत असल्याचं लक्षात घेऊन, देशी गायींचं पालन-पोषण करणाऱ्या पशुपालकांना प्रेरणा देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आलाय.

वैदिक काळापासून गायींना धार्मिक, वैज्ञानिक आणि आर्थिक महत्त्व आहे. मराठवाड्यातील देवणी, पश्चिम महाराष्ट्रातील खिल्लारी, उत्तर महाराष्ट्रातील डांगी आणि विदर्भातील गवळाऊ अशा देशी गायींची विविधता महाराष्ट्रात दिसते. देशी गायींचं दूध पौष्टिक असल्याने ते संपूर्ण आहार मानलं जातं. तसेच शेण आणि गोमुत्र सेंद्रिय शेतीसाठी उपयुक्त ठरतं. या निर्णयामुळे देशी गायींचं संरक्षण आणि संवर्धन होईल, असं सरकारचे म्हणणे आहे.

खराडे ॲग्रोच्या वतीने आवाहन करतो की आपण देखील गोसंवर्धनासाठी हातभार लावावा.




|| पुढील पानावर ||

- गीर गायी; जाती-प्रजाती
- यशोगाथा
- बोल अनुभवाचे

Plot No G 251, M.I.D.C. Baramati || 9309253091 || 9209317742

# मुलांच्या शारीरिक, मानसिक, आणि आध्यात्मिक विकासनासाठी देशी गायीचा सहवास महत्वचा!





**बारामती:** भारतीय समाजात गाय ही केवळ प्राणी नसून ती एक महत्त्वपूर्ण घटक आहे, जी विविध पैलूंमध्ये मुलांच्या शारीरिक, मानसिक, आणि आध्यात्मिक विकासाला पोषक ठरते. तिचे महत्त्व अनेक अंगांनी मांडता येईल.

**दूध आणि पौष्टिकता:** गायीचे दूध लहान मुलांसाठी सर्वोत्तम पेय मानले जाते. यात कॅल्शियम, प्रोटिन आणि व्हिटॅमिन्स, मोठ्या प्रमाणात असतात, ज्यामुळे मुलांच्या हाडांची मजबुती आणि एकंदर शारीरिक वाढ होते. रोजच्या आहारात गायीचे दूध मुलांच्या विकासासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

**आध्यात्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व:** भारतीय संस्कृतीत गायीला आईसमान मानले जाते. मुलांना लहानपणापासून गाईंचे महत्त्व सांगितले जाते, ज्यामुळे त्यांच्यात प्रेम, करुणा आणि सहानुभूतीची भावना विकसित होते. गाईंच्या संगोपनातून मुलांना निसर्ग आणि प्राण्यांच्या प्रती आदरभाव शिकता येतो.

**आरोग्याच्या दृष्टीने फायदे:** गायीचे तूप, दूध आणि दही यांचा वापर लहान मुलांच्या आहारात केला जातो. हे पदार्थ पचनशक्ती सुधारतात आणि प्रतिकारशक्ती वाढवतात. गायीच्या दुधात असलेले घटक मुलांच्या विकासासाठी उपयुक्त ठरतात.

प्रतिबंधक औषधीय गुणधर्म: गायीच्या दुधाचे आणि गाईशी निगडित उत्पादनांचे आयुर्वेदात फार मोठे महत्त्व आहे. गायीचे दूध सर्दी, खोकला, आणि अशक्तपणा यावर गुणकारी आहे. मुलांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी गायीचे दूध आणि तूप आवश्यक ठरते. तसेच, त्यातील अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे प्रतिकारशक्ती वाढवतात.

**शांतता आणि मानसिक स्थैर्य:** गायीच्या सानिध्यात राहिल्याने मुलांना मानसिक शांती आणि स्थैर्य मिळते. तिच्या उपस्थितीत मुलांचे मन अधिक स्थिर आणि सकारात्मक राहते.

**शैक्षणिक दृष्टिकोन:** गायीशी निगडित गोष्टी शिकवण्याचा एक शैक्षणिक दृष्टिकोन देखील आहे. मुलांना गाईचा इतिहास, त्याचे प्रकार, शेतीतील उपयोग आणि तिच्या दूधाचे उत्पादन हे विषय अभ्यासाच्या माध्यमातून समजावून देता येतात. हे ज्ञान केवळ प्राण्यांविषयीच नाही, तर पर्यावरण, विज्ञान आणि समाजशास्त्राच्या अंगाने देखील त्यांचे विचार विस्तृत करतात.

**गाईंचे महत्त्व केवळ त्याच्या उत्पादनांपुरते मर्यादित नाही, तर त्याच्या सहवासाने लहान मुलांच्या विकासावर सकारात्मक परिणाम होतो.**

# बागायती शेती- शास्वत कमाईचा मार्ग!



भारत हा शेती प्रधान देश आहे, असे आपण नेहमी ऐकतो आणि वाचतो याचा अर्थ बहुसंख्य लोक शेती करतात. आणि त्यांची उपजिविका शेतीवर अवलंबून असते. शेतीचे वेगवेगळे प्रकार आहेत. त्यातीलच एक- बागायती शेती.

बागायती शेती ही भरपूर उत्पन्न किंवा नफा देणारी शेती असली, तरी तिच्यासाठी कोणत्या प्रकारची जमीन योग्य आहे, शेती करताना कोणत्या प्रकारची काळाजी घ्यावी याकडे देखिल आपण लक्ष द्यायला हवे.

**बागायती शेतीसाठी कशी जमीन असावी हे पाहुयात:**

पर्जन्यावर कमीतकमी अवलंबित्व व पाण्याची निश्चित उपलब्धता असणाऱ्या जमीनींना बागायती जमिन म्हटले जाते. यात पाण्याच्या उपलब्धतेनुसार वर्षभर पिक घेतली जाऊ शकतात. यात सुद्धा हंगामी किंवा बारमाही बागायती असे दोन प्रकार आहेत.

**बागायती शेतीचे फायदे:**

१) **जास्त उत्पन्न:** नियमित पाणीपुरवठा असल्याने पिकांचा विकास चांगला होतो आणि उत्पन्न, जास्त मिळते.

२) **अनेक पिकांचे उत्पादन:** बागायती शेतीमुळे एकाच शेतात वर्षभर विविध प्रकारची पिकं घेता येतात, जसे की फळं, भाज्या आणि फुले.

३) **पिकांची गुणवत्ता:** योग्य प्रमाणात पाणी मिळाल्यामुळे पिकांची गुणवत्ता सुधारते, ज्यामुळे बाजारात चांगला दर मिळतो.

४) **जोखिम कमी:** अनियमित पावसामुळे पिकांचे नुकसान होण्यासी शक्यता कमी असते.

५) **आर्थिक स्थिरता:** चांगले उत्पादन मिळाल्यामुळे शेतक-यांना आर्थिक स्थिरता मिळते आणि नवनवीन शेती तंत्रज्ञानांचा अवलंब करता येतो.

**बागायती शेतीचे फायदे जसे आहेत, तसेच काही तोटे देखिल आहेत, त्यापैकी काही प्रमुख तोटे पाहुयात.**

सिंचनाची साधने, पाण्याच्या सोयी, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन यासाठी सुरुवातीचा खर्च मोठा असतो. पाण्याचा अपव्यय किंवा वाया जान ही मोठी समस्या आहे व सतत पाण्याचा वापर केल्यास भूजल पातळी खालावू शकते. अधिक उत्पदनासाठी शेतकरी रासायनिक खतांचा आणि किटकनाशकांचा वापर वाढवतात, ज्यामुळे पर्यावरणावर विपीन परिणाम मातीची गुणवत्ता कमी होते.

जर पाणी व्यवस्थापन व्यवस्थित केले नाही तर पिकांचे नुकसान होऊ शकते. याशिवाय, अनपेक्षित हवामान बदल्यामुळे पाणी व्यवस्थापनाच्या योजना अपयशी ठरु शकताता. एका विशिष्टा स्रोतात सतत बागायती शेती केल्यास नैसर्गिक समतोल बिघडू पर्यावरणातील समतोल बिघडू शकतो, ज्यामुळे स्थानिक जैवविविधता कमी होण्याचा धोका असतो.

**बागायती शेतीच्या या तोट्यांचा विचार करून पाण्याचे आणि जमिनीचे योग्य व्यवस्थापन केल्यास या समस्यांवर नियंत्रण ठेवता येऊ शकत.**

# भारताचं पहिलं आणि सर्वात मोठं बांबू उद्यान; वडाळीचं अभिमानास्पद सौंदर्य!



भारतातील पहिले बांबू उद्यान

**अमरावती:** अमरावती जिल्ह्यातील वडाळी येथील वन उद्यानात २३ वर्षांपूर्वी लावलेलं बांबूचं रोपटं आज जवळपास १८ हेक्टर परिसरात पसरून भारताचं पहिलं आणि सर्वात मोठं बांबू उद्यान म्हणून नावारूपाला आलं आहे. हे महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरलं आहे. या उद्यानात ६३ प्रकारच्या बांबू प्रजातींची लागवड करण्यात आली असून त्यात 'मेलीकाना बासिफेरा' बांबू (बासरीसाठी वापरला जातो), जगातील सर्वात जाड असलेला 'महाबांबू', उंचीने सर्वाधिक वाढणारा 'ड्रायड्रोक्लेनेस ब्रँडेसी', आणि अंदमानचा वेली बांबू, तसेच आसामचा सरळ वाढणारा बांबू या प्रजातींचा समावेश आहे.

या उद्यानाच्या परिसरात कमळ आणि कॅक्टस उद्यानांचाही समावेश आहे, ज्यामुळे देश-विदेशातील पर्यटकांची संख्या वाढत चालली आहे. पर्यावरणपूरक बांबूपासून तयार करण्यात आलेल्या विविध वस्तूंचं उत्पादन आणि विक्री या उद्यानात सुरू आहे.

उद्यानात प्रवेश करताच 'बांबूसा वलगेरिस स्टायटा' च्या सोनपिवळ्या बांबूने बनवलेला सुंदर बोगदा लक्ष वेधून घेतो. याशिवाय औषधी वनस्पतींच्या अनेक दुर्मिळ वनस्पती बागेत जतन केल्या आहेत. विशेष म्हणजे, याठिकाणी 'डायनोग्लोबा अंडमानीका' हा वेल बांबू ५० फुटांच्या झाडावर चढलेला पाहायला मिळतो.

उद्यानात असंख्य बांबू प्रजातींच्या रोपट्यांची लागवड करण्यात आली असून 'बांबूसा आसामिका' आणि 'बांबूसा अफीनिस' यांसारख्या महत्त्वाच्या प्रजातींना येथे स्थान मिळालं आहे. या प्रजातींमुळे बांबूचे व्यापारी आणि निर्यातीचे महत्त्वही वाढले आहे. हे उद्यान केवळ बांबू उत्पादनापुरतं मर्यादित नसून, पर्यावरण संरक्षणातसुद्धा मोठं योगदान देतं. येथे बांबूपासून पक्ष्यांसाठी घरटी आणि गांडूळ खताचं उत्पादनही सुरू आहे. या उद्यानातून मिळणाऱ्या उत्पन्नातून अनेक विकास कामं होत आहेत, ज्यामुळे पर्यटकांना एक सुंदर अनुभव मिळतो. वनपाल सैय्यद अहमद यांच्या अथक परिश्रमातून या उद्यानाचं निर्मितीकार्य पुढे सरकलं असून त्यांनी चीनमधील 'अंजी बांबू गार्डन'च्या प्रेरणेने वडाळीचं हे उद्यान अधिक विकसित केलं आहे.

वडाळीचं हे बांबू उद्यान पर्यावरण जपणारं, बांबू प्रजातींचं संवर्धन करणारं, आणि पर्यटकांसाठी एक अद्वितीय आकर्षण बनलं आहे.



## || बोल अनुभवाचे ||

### श्री. अक्षय तोंडले, शेवते-पंढरपूर

माझी पाच वर्ष पूर्वीची 15 एकर पेरू ची बाग आहे. सध्या चार एकर प्लॉट हार्वेस्टिंग चालू आहे त्यामध्ये तीन हजार रोपे आहेत. त्याला आम्ही खराडे अ‍ॅग्रोचं सहा लाख फोम बसवले आहेत. आतापर्यंत दीडशे टन माल गेला आहे व आणखीन माल काढायला चालू आहे. खराडे अ‍ॅग्रोच्या फोमची क्वालिटी एक नंबर आहे. फ्रुटनेट आणि अँटी फोग बॅग या दोन्ही गोष्टींसाठी आमचं हक्काचं ठिकाण म्हणजे 'खराडे अ‍ॅग्रो'. त्यांच्या मालाचा दर्जा आणि सेवा तात्परता याला तोडच नाही!

### श्री. सारिका करांडे, जुजारपूर

माझी चार एकर पेरूची बाग आहे यामध्ये मी खराडे अ‍ॅग्रोचं फोम बसवले आहेत. माझ्या बागेतील फळांसाठी खराडे अ‍ॅग्रोच्या फ्रूटनेटचा वापर केल्यापासून आम्हाला फळमाश्या आणि पक्ष्यांपासून होणारे नुकसान जवळजवळ थांबले आहे. खराडे अ‍ॅग्रोच्या फ्रूटनेटच्या मदतीने आमचे उत्पन्न नक्कीच वाढले आहे आणि आम्ही त्यांच्या सेवा तपर्तेमुळे खूपच समाधानी आहोत. मी आवर्जून सांगेल की तुम्ही खराडे अ‍ॅग्रो, बारामती यांच्याशी संपर्क साधा. त्यांचे फ्रुटनेट, अँटी फोग बॅग तसेच खराडे अ‍ॅग्रोची सेवा तात्परता अतिशय उत्तम आहे!